माझी कन्या भाग्यश्री योजनेसाठी अर्थसंकल्पित केलेला निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१८/प्र.क्र.७५/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च, २०१८

वाचा :- महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.भाग्यश्री-२०१७/प्र.क्र.१०७/का.६, दिनांक १ ऑगस्ट २०१७

शासन निर्णय-

मुलींचा जन्मदर वाढविणे, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे, मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे यासाठी दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून लागू करण्यात आलेली माझी कन्या भाग्यश्री ही योजना अधिक्रमित करुन **सुधारित माझी कन्या भाग्यश्री** ही योजना दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये ७.५० लाखापर्यंत आहे अशा समाजातील सर्व घटकांसाठी लागु करण्यात आलेली आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

२. एका मुलीनंतर मातेने / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर अनुज्ञेय रक्कम (मुलीच्या नावे रु. ५०,००० बँकेत फीक्स डिपॉजिट द्वारे गुंतवण्यात येईल. रुपये ५०,०००/- इतक्या रक्कमेवर १८ वर्षासाठी ६% व्याज अनुज्ञेय आहे.

३. दोन मुलीनंतर मातेने /पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर अनुज्ञेय रक्कम. (पहिल्या व दुस-या मुलीच्या नावे प्रत्येकी रु.२५,०००/- याप्रमाणे रु.५०,००० इतकी रक्कम बँकेत फीक्स डिपॉजिट व्दारे गुंतवण्यात येईल. रुपये २५,०००/- इतक्या रक्कमेवर १८ वर्षासाठी ६% प्रमाणे व्याज अनुज्ञेय आहे. योजनेच्या अटी / शर्ती दिनांक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या आहेत.

४. सदर योजनेतंर्गत लाभार्थ्यांना द्यावयाचा लाभ हा बँकेमार्फत द्यावयाचा आहे. सन २०१७-१८ मध्ये या योजनेसाठी रुपये २५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यापैकी सुधारित अंदाजामध्ये रुपये २०.०० कोटी इतका निधी BDS वर वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेला आहे.

५. माझी कन्या भाग्यश्री योजनेतंर्गत दिनांक १ एप्रिल, २०१६ ते दिनांक ३१ जुलै २०१७ या कालावधीत एकुण १३३९६ अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच दिनांक १/०८/२०१७ पासून दिनांक २८/०२/२०१८ पर्यंत १३७६ अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये योजनेच्या निकषानुसार १ मुलीनंतर कुटुंब नियोजन केलेले **४६८ लाभार्थी** व २ मुलींवर कुटुंब नियोजन केलेले **२९३१ लाभार्थी** असे **एकुण ३३९९ लाभार्थी** प्राप्त ठरलेले असल्याचे आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे.

६. सन २०१७-१८ साठी माझी कन्या भाग्यश्री हया योजेनसाठी २२३५ बी ९३३ या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित केलेला रुपये २०.०० कोटी इतका निधी खर्च करण्यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी **दोन दिवसात** बँकेशी कार्यपध्दती निश्चित करुन पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मंजूर करावा. वित्तीय वर्ष संपण्यास राहीलेला अल्प कालावधी विचारात घेऊन कामाचे नियोजन करुन सदर निधी या वित्तीय वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२०१५३८५२५०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.03.20 16:40:29 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
५) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
७) सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद)
८) वित्त विभाग (व्यय/६ ,अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
९) नियोजन विभाग(का.१४७२),मंत्रालय,मुंबई.
१०) सह सचिव/उप सचिव (श्री. गुजर /श्रीम. निवतकर), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना BDS वर वितरीत करावा.
१२) निवड नस्ती -का-६.